सोमवार दि. २७ जुलै २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३२६ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### ४० वर्षांच्या प्रतीक्षेला अखेर पूर्णविराम

## जालन्यात झोपडपट्टीधारकांना पीआर कार्डांचे वितरण

### मुक्तेश्वर येथील छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिरात वितरण ; लाभार्थ्यांचा सत्कार; हजारो पात्र नागरिकांच्या अपेक्षा अजूनही कायम

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील झोपडपट्टीधारकांच्या गेल्या चार दशकांपासून प्रलंबित असलेल्या पीआर (प्रमाणपत्र) कार्डाच्या मागणीला अखेर सुरुवात झाली असून, मुक्तेश्वर येथे रविवारी आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर अभियानात पात्र लाभार्थ्यांना पीआर कार्डांचे वितरण करण्यात आले. आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते लाभार्थ्यांना पीआर कार्डांचे वितरण करण्यात आले. अनेक वर्षांपासून स्वतःच्या घराच्या हक्कासाठी शासनाकडे पाठपुरावा करणाऱ्या झोपडपट्टीधारकांसाठी हा कार्यक्रम दिलासादायक ठरला. शहरातील झोपडपट्टीधारकांना पीआर कार्ड मिळावे, यासाठी माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, माजी आमदार कैलास गोरंट्याल, आमदार अर्जुनराव खोतकर यांच्यासह विविध लोकप्रतिनिधींनी सातत्याने शासनाकडे पाठपुरावा केला होता. विशेष म्हणजे, हा प्रश्न आमदार खोतकर यांनी महाराष्ट्र विधानसभेतही प्रभावीपणे उपस्थित करून संबंधित प्रशासनाचे लक्ष वेधले होते. त्यानंतर प्रशासनाने प्रक्रिया गतीने राबविण्यास सुरुवात केली.

**४० वर्षांची प्रतीक्षा संपली; मात्र हजारो लाभार्थी अजूनही प्रतीक्षेत**

जालना शहरातील अनेक झोपडपट्टीधारक गेल्या सुमारे ४० वर्षांपासून पीआर



कार्डाच्या प्रतीक्षेत होते. या कार्डामुळे झोपडपट्टीधारकांना त्यांच्या निवासस्थानासंदर्भातील अधिकृत ओळख मिळण्याबरोबरच विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासही मदत होणार आहे. तथापि, सध्या केवळ सुमारे २५ लाभार्थ्यांनाच पीआर कार्डांचे वितरण करण्यात आले आहे. शहरातील हजारो झोपडपट्टीधारक अजूनही या प्रक्रियेच्या प्रतीक्षेत असून, उर्वरित पात्र नागरिकांनाही लवकरात लवकर पीआर कार्ड मिळावेत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

जालना महानगरपालिका निवडणुकीदरम्यान पीआर कार्डचा प्रश्न हा प्रमुख निवडणूक मुद्दा ठरला होता. त्या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जालना येथील प्रचारसभांमध्ये झोपडपट्टीधारकांना पीआर कार्ड देण्याचे आश्वासन दिले होते. आता प्रत्यक्षात पीआर कार्ड वितरणास सुरुवात झाल्याने त्या आश्वासनाची पूर्तता होत असल्याचे चित्र दिसत आहे.

१४ झोपडपट्ट्यांचे सर्वेक्षण अंतिम टप्प्यात शहरातील १४ झोपडपट्ट्यांमध्ये सीएफएसडी () संस्थेमार्फत सर्वेक्षण सुरू असून जवळपास ७ हजारांहून अधिक घरांचे सर्वेक्षण अंतिम टप्प्यात आहे. या सर्वेक्षणानुसार अंदाजे ४०० ते ४५० झोपडपट्टीधारक पात्रतेच्या निकषात बसत असल्याचे समोर आले आहे. मात्र, त्यापैकी अद्याप केवळ २५ जणांनाच पीआर कार्डांचे वितरण करण्यात आल्याने उर्वरित पात्र लाभार्थ्यांमध्ये प्रतीक्षा कायम आहे.

जिल्हाधिकारी आसिमा मित्तल यांनी गेल्या महिन्यात संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन पीआर कार्ड वितरण प्रक्रियेला गती देण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या होत्या. त्यानंतर कागदपत्रांची पडताळणी *(पान २ वर)*

---

### महाराष्ट्राच्या मातीतील खेळाचा सन्मान:

## जालन्यात गुणवंत कबड्डी खेळाडू, पंच व प्रशिक्षकांचा दिमाखदार गौरव सत्कार!

**जालना । प्रतिनिधी**

स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त तसेच महाराष्ट्र कबड्डी दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस, जालना शहर आणि जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील गुणवंत कबड्डी खेळाडू, पंच व प्रशिक्षकांचा भव्य गौरव सत्कार सोहळा रेल्वे स्टेशन रोड येथील क्रीडा प्रबोधिनी, गांधी चमन येथे मोठ्या उत्साहात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडला. जिल्हाभरातून आलेल्या खेळाडू, प्रशिक्षक, पंच, क्रीडाप्रेमी व मान्यवरांच्या



उपस्थितीमुळे संपूर्ण परिसरात क्रीडामय उत्सवाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाचे उद्घाटन माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदअण्णा चव्हाण होते. व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष नझीर काझी, जिल्हा कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष अक्षय गोरंट्याल, रविंद्र तोर, सौ. शकुंतला कदम, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शहरप्रमुख विष्णू पाचफुले, राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष शेख मेहमूद, डॉ. सुरजसिंह तौर, मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक अशोक पडूळ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविकात प्रा. सोपानराव तेलगड यांनी स्व. अजितदादा पवार यांच्या क्रीडा क्षेत्रातील कार्याचा गौरव करत, ''कबड्डी हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आणि ग्रामीण जीवनाचा अविभाज्य भाग आहे. गुणवंत खेळाडू, पंच व प्रशिक्षकांचा सन्मान म्हणजे नव्या पिढीतील खेळाडूंना प्रेरणा देणारा उपक्रम आहे,'' असे सांगितले. उद्घाटनपर भाषणात माजी मंत्री अर्जुनराव *(पान २ वर)*

## भाजपा प्रदेश महामंत्री प्रणिता देवरे यांची गोरंटयाल यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

**जालना - प्रतिनीधी**

भाजपाच्या प्रदेश महामंत्री प्रणिताताई देवरे चिखलीकर यांनी जालन्याचे माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंटयाल यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. शहरातील प्रीती सुधानगर मधील निवासस्थानी प्रणिताताई देवरे चिखलीकर यांचा माजी आमदार कैलास गोरंटयाल,जालन्याच्या माजी नगराध्यक्षा तथा विद्यमान नगरसेविका सौ.संगीताताई गोरंटयाल, युवा नेते नगरसेवक अक्षय गोरंटयाल यांनी



शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. याप्रसंगी भाजपा महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष तथा नगरसेविका सौ.संध्याताई देठे, पाणी पुरवठा सभापती सौ.पूनम स्वामी, बांधकाम सभापती माया जोशी, नगरसेविका सखुबाई पानबिसरे, ऐश्वर्याताई आडेकर, श्रद्धा साळवे, अनिताताई खोडवे, राज स्वामी, संजय देठे आदीं.ची उपस्थिती होती.

---

## साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त जालन्यात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन

### रक्तदान, साहित्य वाटप, मोटारसायकल रॅलीसह विविध कार्यक्रमांचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी**

साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त आधुनिक लहुजी सेना, जालना जिल्ह्याच्या वतीने शनिवार, दि. १ ऑगस्ट २०२६ रोजी शहरात विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि जनजागृतीपर उपक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांची माहिती भाजपचे नगरसेवक अक्षय गोरंट्याल यांनी रविवारी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.



पत्रकार परिषदेत बोलताना नगरसेवक अक्षय गोरंट्याल म्हणाले की, साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्य, लोककला आणि समाजप्रबोधनाच्या कार्यातून वंचित, श्रमिक आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडली. त्यांच्या विचारांचा आणि सामाजिक समतेच्या संदेशाचा प्रसार समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावा, या उद्देशाने दरवर्षी विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. यंदाही जयंतीनिमित्त सामाजिक बांधिलकी जपणारे अनेक *(पान २ वर)*

## १ कोटी ७८ लाख ८१ हजार ३३० रुपयांचा मुद्देमाल जप्त

### *कामगार कल्याण विभागात कोट्यवधींचा घोटाळा, विवेक कुंभारांची चौकशी व अमोल जाधव यांना कायमस्वरूपी सेवेतून बडतर्फ करा - आमदार बबनराव लोणीकर*

**जालना - प्रतिनिधी**

कामगार कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांमध्ये तसेच मोफत संसारोपयोगी भांडी वितरण योजनेत कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार, आर्थिक गैरव्यवहार, बनावट लाभार्थी तयार करून शासनाची फसवणूक आणि पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न झाल्याचा गंभीर आरोप माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय व स्वतंत्र चौकशी करून कामगार कल्याण विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक कुंभार, तत्कालीन जिल्हा सरकारी कामगार अधिकारी अमोल जाधव तसेच संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि एजन्सींवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी त्यांनी केली. तसेच अमोल जाधव यांना केवळ बदली किंवा निलंबन न करता कायमस्वरूपी शासकीय सेवेतून बडतर्फ करण्यात यावे, अशी ठाम मागणीही त्यांनी केली.

लोणीकर म्हणाले की, कामगारांच्या नावावर राबविण्यात येणाऱ्या योजनांमध्ये मोठ्या प्रमाणावर बोगस लाभार्थी तयार करण्यात आले. तब्बल ३५ मृत व्यक्तींच्या नावावर शासकीय लाभाची रक्कम उचलण्यात आल्याचा आरोप असून दैठणा (बु.) येथील ५ व्यक्तींना लाभार्थी दाखविण्यात आले असले तरी त्या प्रत्यक्षात त्या गावच्या रहिवासी नसल्याचा दावा करण्यात आला आहे. सरपंच परिषदेचे जिल्हाध्यक्ष शत्रुघ्न कणसे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दैठणा येथील ५ बोगस लाभार्थ्यांच्या नावावर सुमारे १३ लाखांचा अपहार झाला असून, संपूर्ण जालना जिल्ह्यात ३४० कथित बोगस लाभार्थ्यांच्या माध्यमातून मृत्यू सहाय्य, विवाह सहाय्य आणि शिष्यवृत्ती योजनांमध्ये सुमारे ८ कोटी ८४ लाखांचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप आहे. लाभार्थ्यांना रक्कम वितरित झाल्यानंतर कामगार विभागाच्या अधिकृत पोर्टलवरील नोंदी हटवून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न झाल्याची माहिती समोर येत असल्याने संपूर्ण पोर्टलची फॉरेन्सिक तपासणी करून सर्व आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्याची मागणीही त्यांनी केली.

मोफत संसारोपयोगी भांडी वितरण योजनेतही मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचा आरोप *(पान २ वर)*

---

### नोएडामध्ये राष्ट्रीय यूथ गेम कराटे चॅम्पियनशिप २०२६ उत्साहात

## जालना जिल्ह्याच्या खेळाडूंची सुवर्ण कामगिरी, २३ पदकांची कमाई

**नोएडा (उत्तर प्रदेश) । प्रतिनिधी**

भारतीय आर्ट्स अँड स्पोर्ट्स यूथ गेम असोसिएशनच्या वतीने आयोजित राष्ट्रीय यूथ गेम कराटे चॅम्पियनशिप २०२६ स्पर्धेचे भव्य आयोजन उत्तर प्रदेशातील नोएडा इंडोर स्टेडियम येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. देशभरातील विविध राज्यांमधून शेकडो कराटेपटूंनी या राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेत आपल्या उत्कृष्ट कौशल्याचे दर्शन घडविले. स्पर्धेत जालना जिल्ह्याच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत ११ सुवर्ण, ५ रौप्य आणि ७ कांस्य अशी एकूण २३ पदके जिंकून



महाराष्ट्रासह जालना जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला.

जालना जिल्ह्यातील कराटेपटूंनी सेन्साई रुपेंद्र गोपाल पारचा यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. खेळाडूंनी काता प्रकारात ११ सुवर्ण, ३ रौप्य आणि १ कांस्य, तर कुमिते प्रकारात २ रौप्य आणि ६ कांस्य पदके मिळवत राष्ट्रीय स्तरावर आपली छाप पाडली. या यशामुळे जालना जिल्ह्यातील कराटे क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून खेळाडूंवर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या स्पर्धेचे प्रमुख पाहुणे म्हणून नोएडा एम्प्लॉइज असोसिएशनचे अध्यक्ष राजकुमार सिंह उपस्थित होते. त्यांनी विजेत्या तसेच सहभागी खेळाडूंचे अभिनंदन करत खेळातून शिस्त, आत्मविश्वास, राष्ट्रीय एकात्मता आणि निरोगी स्पर्धात्मक वृत्ती विकसित होत असल्याचे सांगितले. युवकांनी क्रीडा क्षेत्रात अधिकाधिक सहभाग नोंदवून देशाचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

स्पर्धेचे आयोजन सचिव तथा भारतीय आर्ट्स अँड स्पोर्ट्स यूथ गेम असोसिएशनचे अध्यक्ष शिहान विशाल जाधव यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण स्पर्धेचे यशस्वी नियोजन करण्यात आले. उद्घाटन राष्ट्रगीताने करण्यात आले. त्यानंतर सहभागी राज्यांच्या संघांनी आकर्षक मार्च-पास्ट आणि सलामी *(पान २ वर)*

## नागपूरच्या सुनियोजित विकासासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नागपूर - प्रतिनिधी**

जागतिक बँकेच्या अहवालानुसार येत्या दहा वर्षात नागपूर शहर जलदगतीने विकसित होत असून पायाभूत सुविधांच्या विकासामुळे शहराचा चेहरा बदलत आहे. एक वैश्विक शहर नवी ओळख निर्माण होत असल्यामुळे शहराच्या सुनियोजित विकासासाठी निधी पडू दिला जाणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. महानगरपालिकेच्या हिरवळीवर आयोजित विशेष समारंभात शहरातील ४७६ सफाई कामगारांना कायम नियुक्तीपत्र तसेच सरळसेवा भरतीने १०३ युवकांना नियुक्तीपत्राचे वाटप मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी होते. यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर नीता ठाकरे, आमदार सर्वश्री मोहन मते, कृष्णा खोपडे, उपमहापौर लिला हाथीबेड, राज्य सफाई कामगार आयोगाचे अध्यक्ष शेरसिंह डागोर, स्थायी समितीच्या अध्यक्षा *(पान २ वर)*

# संपादकीय....

## महापौरांचा अधिकार की अधिकाराचा अतिरेक? कायदा नेमके काय सांगतो?

जालना महानगरपालिकेतील महापौर आणि अपक्ष नगरसेवक श्रीकांत पांगारकर यांच्यात निर्माण झालेला वाद हा केवळ एका नोटिशीपुरता मर्यादित नाही. या निमित्ताने एक मूलभूत प्रश्न पुढे आला आहेमहापौरांना एखाद्या नगरसेवकाला कारणे दाखवा नोटीस किंवा स्पष्टीकरणाची नोटीस बजावण्याचा अधिकार आहे का? या प्रश्नाचे उत्तर भावनेत किंवा राजकारणात नसून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि सभेच्या कार्यपद्धतीच्या नियमांमध्ये शोधावे लागेल. महापौर हे महानगरपालिकेचे प्रथम नागरिक आणि सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष असतात. सभा सुरळीत चालविणे, कामकाजाचे संचालन करणे, सदस्यांना बोलण्याची संधी देणे, शिस्त राखणे आणि नियमांचे पालन करणे, ही त्यांची प्रमुख जबाबदारी आहे. सभेदरम्यान एखादा सदस्य नियमबाह्य वर्तन करत असल्यास त्याला सूचना देणे, आवश्यक असल्यास बोलण्यास मज्जाव करणे किंवा नियमांनुसार सभागृहाबाहेर जाण्याचे निर्देश देण्याचे अधिकार अध्यक्ष म्हणून महापौरांकडे असतात. मात्र, सभा संपल्यानंतर एखाद्या नगरसेवकाला स्वतंत्रपणे कारणे दाखवा नोटीस बजावणे किंवा त्याच्यावर शिस्तभंगाची कारवाई सुरू करण्याचा अधिकार महापौरांना थेट आहे का? याचे उत्तर सरळ होय असे देता येत नाही. शिस्तभंगाची कारवाई, सदस्य अपात्रता, गैरवर्तन किंवा सभागृहाच्या विशेषाधिकाराशी संबंधित बाबींसाठी कायद्यात स्वतंत्र प्रक्रिया आहे. अनेक प्रकरणांमध्ये महानगरपालिका आयुक्त, सर्वसाधारण सभा, स्थायी समिती, किंवा आवश्यकतेनुसार राज्य शासन आणि न्यायालयीन यंत्रणा यांची भूमिका महत्त्वाची ठरते. गंभीर स्वरूपाच्या कारवाईसाठी केवळ महापौरांचा निर्णय अंतिम मानला जात नाही. जर महापौरांनी एखादी नोटीस दिली असेल, तर ती सभापती म्हणून स्पष्टीकरण मागविण्याच्या स्वरूपाची आहे की कायदेशीर शिस्तभंगाच्या कारवाईची, हे पाहणे आवश्यक आहे. कारण या दोन बाबींमध्ये मूलभूत फरक आहे. याच कारणामुळे श्रीकांत पांगारकर यांनी केलेला दावा आणि महापौरांनी केलेली कृती या दोन्हींची वस्तुनिष्ठ तपासणी होणे आवश्यक आहे. जर नोटीस केवळ सभेच्या कामकाजाशी संबंधित स्पष्टीकरणासाठी असेल, तर तिचे स्वरूप वेगळे ठरते. पण जर ती कायदेशीर कारवाईचा प्रारंभ असल्याचा दावा केला जात असेल, तर त्या अधिकाराचा स्रोत स्पष्ट करावा लागेल. या वादात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे लोकशाहीतील विरोधी पक्षाची भूमिका. विरोधी सदस्यांनी प्रशासनावर प्रश्न उपस्थित करणे हा लोकशाहीचा आत्मा आहे. त्याचवेळी सभागृहाचे शिष्टाचार आणि नियमांचे पालन करणे ही प्रत्येक नगरसेवकाचीही जबाबदारी आहे. त्यामुळे विरोधकांचा आवाज दाबणे आणि सभेतील शिस्त राखणे यामधील सीमारेषा अत्यंत सूक्ष्म आहे. आज गरज आहे ती राजकीय आरोप-प्रत्यारोपांपेक्षा कायदेशीर स्पष्टतेची. जर महापौरांना असा अधिकार असेल, तर तो कोणत्या कलमानुसार आहे, हे स्पष्ट व्हावे. आणि जर असा अधिकार नसेल, तर भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही, यासाठी स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे असावीत. या संपूर्ण प्रकरणात सर्वाधिक महत्त्वाची बाब म्हणजे महापालिकेचा मूळ अजेंडा मागे पडू नये. शहरातील पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, ड्रेनेज, कचरा व्यवस्थापन आणि नागरिकांच्या दैनंदिन समस्या या प्रश्नांवर चर्चा होण्याऐवजी राजकीय संघर्ष केंद्रस्थानी येत असेल, तर त्याचे नुकसान शेवटी जालनाकरांनाच सहन करावे लागेल. कायद्यापेक्षा कोणीही मोठा नाही. महापौर असोत किंवा नगरसेवकदोघांनीही आपले अधिकार आणि मर्यादा संविधान व कायद्याच्या चौकटीतच वापरणे हीच लोकशाहीची खरी कसोटी आहे.

## इंडियन टॅलेंट ओलंपियाड मध्ये मातोश्री पार्वतीबाई कुंभार प्राथमिक शाळेचे घवघवीत यश



**दौंड । प्रतिनिधी**

सन २०२५ २६ मध्ये झालेल्या इंडियन टॅलेंट ओलंपियाड या देशपातळीवर स्पर्धा परीक्षेत एकूण ४२५११ शाळेने सहभाग घेतला त्यामध्ये मातोश्री पार्वतीबाई कुंभार प्राथमिक शाळेतील २५३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता त्यापैकी रणजीत श्याम ठाणेदार इयत्ता दुसरी हा विद्यार्थी राज्यात ३ रा व प्रथमेश चारुदत्त कडू हा विद्यार्थी राज्यात ५ वा आला. रणजीत व प्रथमेशचे संस्थेचे सचिव श्री सुभाष गणपतराव डावरे, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ. कविताताई सुभाष डावरे, मुख्याध्यापक श्री संभाजी शंकर थोरात यांनी कौतुक केले. तसेच परीक्षा प्रमुख सौ अपर्णा संतोष गदादे व त्यांच्या सहकाऱ्यांनी मार्गदर्शन केले त्याबद्दल त्यांचाही सत्कार करून कौतुक करण्यात आले.


दैनिक युवा आदर्श दि. २७-०७-२०२६

CHANGE IN NAME

I HAVE CHANGE MY NAME FROM

My Old Name

**CHIMANE TATYARAO APPASAHEB**

To New Name

**TATYASAHEB APPASAHEB CHIMANE**

For Passport Issuence

Add- Main Road, Tirthpuri, Ghansawangi, Jalna. 431209.


# डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम : क्षेपणास्त्र प्रणालीचे जनक

भारताच्या क्षेपणास्त्र प्रणालीचे जनक, जेष्ठ शास्त्रज्ञ आणि भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांची आज अकरावी पुण्यतिथी. १५ ऑक्टोबर १९३१ रोजी तामिळनाडूतील रामेश्वरम येथे त्यांचा जन्म झाला. त्यांचे पूर्ण नाव अबुल पाकिर जैनूलाबदिन अब्दुल कलाम असे होते. अब्दुल कलाम यांचे वडील नावाडी होते. रामेश्वरमला येणाऱ्या यात्रेकरूंना होडीने धनुष्यकोडीला नेण्याआणण्याचे काम ते करीत. अब्दुल कलाम शाळेत असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने ते गावात वर्तमानपत्र विकू लागले. त्यांचे बालपण काबाडकष्ट करण्यातच गेले. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते उच्च शिक्षणासाठी तिरुचिरापल्ली येथील सेंट जोसेफ कॉलेजमध्ये दाखल झाले. तेथे बीएससी झाल्यानंतर त्यांनी मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीत प्रवेश घेतला. प्रवेशासाठी त्यांच्याकडे पैसे नसल्याने त्यांच्या बहिणीने दागिने गहाण ठेवून त्यांना पैसे दिले. या संस्थेतून एरोनॉटिक्सचा डिप्लोमा पूर्ण केल्यानंतर त्यांनी अमेरिकेतील नासा संस्थेत चार महिने एरोस्पेस टेक्नॉलॉजीचे प्रशिक्षण घेतले. भारतात आल्यावर त्यांनी सहा वर्ष डीआरडीओमध्ये शास्त्रज्ञ म्हणून काम केले. १९६३ पासून ते इसरो संस्थेत क्षेपणास्त्र विकासातील एसएलव्ही ( सॅटेलाईट लाँचिंग व्हेईकल ) संशोधनात भाग घेऊ लागले. पुढे ते या प्रकल्पाचे प्रमुख बनले. इसरोचे तत्कालीन प्रमुख विक्रम साराभाई हे अब्दुल कलाम यांच्या कार्याने प्रभावित झाले. विक्रम साराभाई व अब्दुल कलाम यांच्यात गुरू शिष्याचे नाते निर्माण झाले. विक्रम साराभाई यांनी भारतात विज्ञान तंत्रज्ञानाची आघाडी डॉ कलाम यांनी सांभाळावी असे वक्तव्य केले होते, ते पुढे कलामांनी सार्थ करून दाखवले. पुढे साराभाई यांचेच नाव दिलेल्या विक्रम साराभाई अवकाश केंद्राचे ते प्रमुख बनले. इंदिरा गांधी पंतप्रधान असताना भारताने क्षेपणास्त्र विकासाचा एकात्मिक कार्यक्रम हाती घेतला. या कार्यक्रमाच्या प्रमुखपदी अब्दुल कलाम यांची नेमणूक करण्यात आली त्यामुळे ते पुन्हा डीआरडीओत दाखल झाले. तिथे स्वदेशी बनावटीचे क्षेपणास्त्र तयार करण्याचे शिवधनुष्य त्यांनी लीलया पेलले. डीआरडीओत देशातील नामवंत शास्त्रज्ञांचा संच त्यांच्याकडे होता. वैयक्तिक कामगिरीपेक्षा सांघिक कामगिरीवर त्यांचा भर असायचा. देशातील उत्तम शास्त्रज्ञांकडून सर्वोत्तम कामगिरी करून घेण्याची कला त्यांच्याकडे होती.

क्षेपणास्त्र विकास कार्यातील अग्नी या क्षेपणास्त्राचे यशस्वी प्रेक्षपण केल्यावर त्यांचे जगभर कौतूक झाले. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना ते पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार बनले. पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार म्हणून काम करताना देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांनी अनेक प्रभावी धोरणांची आखणी केली. त्यांनी पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार व डीआरडीओ चे प्रसुख म्हणून अर्जुन हा एम. बी. टी ( मेन बॅटल टँक ) रणगाडा व लाईट कॉबॅट एअरक्राफ्ट ( एलसीए ) यांच्या निर्मितीत महत्वाची भूमिका पार पाडली. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली १९९८ साली भारताने पोखरण येथे यशस्वी अणूचाचणी केली. विज्ञानाचे परमभोक्ता असणारे अब्दुल कलाम मनाने खूप संवेदनशील व साधे होते. त्यांना रुद्रविना वाजवण्याचा आणि मुलांशी गप्पा मारण्याचा छंद होता. भारत सरकारने पद्मभूषण, पद्मविभूषण व १९९८ साली भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. डॉ कलाम हे अविवाहित व पूर्ण शाकाहारी होते. जगातील सर्वात मोठ्या लोकशाही राष्ट्राच्या राष्ट्रपतीपदी निवड झालेले डॉ अब्दुल कलाम हे तरुणांना सदैव प्रेरणा देणारे व्यक्तिमत्त्व होते. राष्ट्रपतीपदावर विराजमान झाल्यावर डॉ कलाम यांनी मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्याचे काम केले. मोठी स्वप्ने पाहा आणि त्यासाठी भरपूर कष्ट करा असे ते तरुणांना सांगत. देशातील तरुणांवर त्यांचा खूप विश्वास होता. आपल्या देशातील तरुणांमध्ये खूप ऊर्जा आहे या ऊर्जेचा योग्य वापर केला तर देश महासत्ता बनेल असे ते नेहमी म्हणत. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. अग्निपंख, इंडिया २०-२०, इग्निटटेड माईंडस ही त्यांनी लिहिलेली पुस्तके खूप गाजली. अग्निपंख हे त्यांनी लिहिलेले पुस्तक बेस्ट सेलर ठरले. राष्ट्रपतीपदावरून निवृत्त झाल्यावर डॉ कलाम विविध संस्थांमध्ये जाऊन व्याख्याने देत असत. २७ जुलै २०१५ रोजी तरुणांना व्याख्यान देत असतानाच त्यांचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या अकाली निधनाने भारताच्या वैज्ञानिक क्षेत्रात जी पोकळी निर्माण झाली ती कधीही भरून निघणार नाही. डॉ ए.पी. जे अब्दुल कलाम यांना पुण्यतिथीनिमित्ताने विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# पान १ व ४ वरुन...

### जालन्यात झोपडपट्टीधारकांना...

पात्रतेची निश्चिती आणि प्रमाणपत्र वितरणाची प्रक्रिया अधिक वेगाने सुरू करण्यात आली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिरात विविध शासकीय योजनांचा लाभ नागरिकांना देण्यात आला. महसूल, महापालिका आणि इतर शासकीय विभागांच्या माध्यमातून नागरिकांच्या विविध अर्जांचा निपटारा करण्यात आला. याच कार्यक्रमात पात्र झोपडपट्टीधारकांना पीआर कार्डांचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाला जिल्हाधिकारी आसिमा मित्तल, उपविभागीय अधिकारी रामदास दौंड, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, भाजप महानगराध्यक्ष भास्कर दानवे, स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर, पंडित भुतेकर, भाऊसाहेब घुगे, संतोष मोहिते, विष्णू पाचफुले, विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने लाभार्थी उपस्थित होते.

### महाराष्ट्राच्या मातीतील...

खोतकर म्हणाले, ''कबड्डी हा महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचा खेळ आहे. ग्रामीण भागातील असंख्य युवकांना या खेळामुळे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळाली आहे. अशा गौरव सोहळ्यांमुळे खेळाडूंचा आत्मविश्वास वाढतो आणि जिल्ह्याची क्रीडा चळवळ अधिक बळकट होते.'' यावेळी जिल्ह्यातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडू, प्रशिक्षक आणि पंचांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन दिमाखदार सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात सर्व सन्मानार्थींचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे संयोजक तथा जिल्हा कबड्डी असोसिएशनचे जिल्हा सचिव डॉ. प्रशांत सोपानराव तेलगड यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे अन्वर मिर्झा, रिंकल तयाड, वंदना खांडेभराड, शीतल बारोटे तसेच शिवसेनेचे शुभम टेकाळे, संतोष मोहिते यांच्यासह जिल्ह्यातील क्रीडाप्रेमी, खेळाडू, प्रशिक्षक, नागरिक आणि विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ...

कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. जयंती कार्यक्रमाची सुरुवात सकाळी महिला शासकीय रुग्णालयात रुग्णांना फळवाटप करून होणार आहे. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येईल. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड वाढावी आणि गरजू विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

यानंतर अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळ भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, युवकांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून सामाजिक जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच शहरातून भव्य मोटारसायकल रॅली काढण्यात येणार असून, या रॅलीद्वारे अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा प्रसार आणि सामाजिक ऐक्याचा संदेश दिला जाणार आहे.

महिलांसाठी विशेष हळदी-कुंकू कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले असून, महिलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग अपेक्षित असल्याचे आयोजकांनी सांगितले.

सायंकाळी आनंदगड, देऊळगाव राजा रोड येथे उभारण्यात येणाऱ्या भव्य व्यासपीठावर मुख्य स्वागत समारंभ, मान्यवरांचे मार्गदर्शन तसेच सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवर, समाजबांधव, युवक-युवती आणि महिला मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याची माहिती देण्यात आली. नगरसेवक अक्षय गोरंट्याल यांनी जालना शहरातील नागरिक, युवक, महिला तसेच समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांना अभिवादन करावे आणि सामाजिक सलोखा, शिक्षण व समाजसेवेचा संदेश देणारे हे उपक्रम यशस्वी करावेत, असे आवाहन केले.

आधुनिक लहुजी सेना, जालना जिल्ह्याच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या जयंती महोत्सवामुळे सामाजिक ऐक्य, सेवा आणि प्रबोधनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

### १ कोटी ७८ लाख...

करत लोणीकर म्हणाले की, लाभार्थ्यांकडून नोंदणी शुल्काच्या नावाखाली पावतीशिवाय पैसे वसूल करण्यात आले, तर अनेक लाभार्थ्यांना भांडी न देता ती दलालांमार्फत विक्रीसाठी वळविण्यात आली. या प्रकरणात परतूर येथे मध्यरात्री एमएच-१२-यूएम-६२५८ क्रमांकाचा ट्रेलर पकडण्यात आला असून त्यामध्ये सुमारे १,२०० भांड्यांचे संच आढळून आले. या कारवाईदरम्यान स्वतः आमदार बबनराव लोणीकर रात्री उशिरापर्यंत घटनास्थळी उपस्थित होते. तसेच भाजप कार्यकर्ते जगदीश पडूळकर आणि इतर कार्यकर्त्यांनी ट्रक पकडण्यासाठी विशेष प्रयत्न केल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रकरणात आतापर्यंत तीन स्वतंत्र गुन्हे दाखल झाले असून एकूण १ कोटी ७८ लाख ८१ हजार ३३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. परतूर पोलीस ठाण्यात एफआयआर क्रमांक ०१८२/२०२६ अंतर्गत १६६ संचांसह १६ लाख २४ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून अनिल मुळे, मारोती खंदारे, सरिता खंदारे आणि अप्सर शेख यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले. यदलापूर येथे एफआयआर क्रमांक ०३४७/२०२६ अंतर्गत ५४ लाख ३७ हजार ०६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून अनिल मुळे व बंडू केदार यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. तर मंठा पोलीस ठाणे हद्दीत एफआयआर क्रमांक ०३९९/२०२६ अंतर्गत १ कोटी ८ लाख १९ हजार ६२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून अनिल मुळे व विठ्ठल नळगे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लोणीकर यांनी आरोप केला की, कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी कारवाईच्या सूचना दिल्यानंतरही कामगार कल्याण विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक कुंभार यांनी तत्कालीन जिल्हा सरकारी कामगार अधिकारी अमोल जाधव यांच्यावर कोणतीही कारवाई केली नाही. उलट त्यांना वाचविण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न करण्यात आला. संबंधित एजन्सीची नियुक्तीही विवेक कुंभार यांच्या माध्यमातून झाल्याचा आरोप त्यांनी केला. वेळेत अमोल जाधव यांना निलंबित करून संबंधित एजन्सी रद्द केली असती तर तीन-तीन गुन्हे दाखल होण्याची वेळ आली नसती, असे ते म्हणाले. त्यामुळे विवेक कुंभार यांच्या भूमिकेचीही उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी. तसेच अमोल जाधव यांना कायमस्वरूपी शासकीय सेवेतून बडतर्फ करून, विवेक कुंभार, संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि एजन्सीविरुद्ध स्वतंत्र एसआयटी किंवा अन्य सक्षम यंत्रणेमार्फत चौकशी करून फौजदारी गुन्हे दाखल करावेत आणि दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी केली.

### नोएडामध्ये राष्ट्रीय...

सादर केली. विविध वयोगटातील कराटेपटूंनी सादर केलेल्या कराटे प्रात्यक्षिकांनी उपस्थितांची मने जिंकली. मान्यवरांच्या हस्ते खेळाडूंचा सत्कार करण्यात आला तसेच प्रेरणादायी मार्गदर्शनही करण्यात आले. या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र, राजस्थान, गुजरात, पंजाब, उत्तर प्रदेश, बिहार, उत्तराखंड, दिल्ली आणि हरियाणा या राज्यांसह अनेक राज्यांतील खेळाडूंनी सहभाग घेतला. दिवसभर स्टेडियममध्ये प्रशिक्षक, पंच, अधिकारी, पालक आणि क्रीडाप्रेमींची मोठी उपस्थिती होती. प्रत्येक सामन्यात खेळाडूंनी उत्कृष्ट तांत्रिक कौशल्य, शिस्त आणि जिद्दीचे दर्शन घडविल्याने स्पर्धा अत्यंत रंगतदार ठरली.

स्पर्धेच्या समारोपावेळी विजेत्या खेळाडूंना पदके व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. आयोजन समितीने सर्व सहभागी राज्यांचे खेळाडू, प्रशिक्षक, पंच, मान्यवर आणि सहकाऱ्यांचे आभार मानत भविष्यातही अशा राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांचे आयोजन करून देशातील युवा खेळाडूंना अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्याचा निर्धार व्यक्त केला.

जालना जिल्ह्याच्या खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर मिळविलेल्या या दैदिप्यमान यशामुळे जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्राचा गौरव वाढला असून, आगामी आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्येही हे खेळाडू उल्लेखनीय कामगिरी करतील, असा विश्वास क्रीडाप्रेमींनी व्यक्त केला.

### नागपूरच्या सुनियोजित ...

शिवानी दाणी, महापालिका आयुक्त डॉ. विपीन इटनकर, अतिरिक्त आयुक्त मुरगनाथन एम., श्री. अंकित आदी अधिकारी तसेच विविध समित्यांचे सभापती, पदाधिकारी व नगरसेवक यावेळी उपस्थित होते. शहर स्वच्छ व सुंदर राहिल्यास त्याचा सार्वजनिक आरोग्यावरही परिणाम होतो. स्वच्छतादूतांचा आस्थापना खर्च जास्त असल्यामुळे नियुक्तीसाठी विशेष सूट देण्यात आल्यामुळे मोठ्या प्रमाणात भरती झाल्याचे सांगताना मुख्यमंत्री म्हणाले की, लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार ४७६ स्वच्छतादूतांना नियुक्तीपत्र देण्यात आले आहेत. या समितीने सेवाविषयक बाबींचा अहवालानुसार शासन निर्णय निघूनही भरती होत नव्हती. या अहवालाच्या अंमलबजावणीला प्राधान्य दिल्यामुळे सफाई कामगारांचे विविध प्रश्न सोडविण्यात आल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

स्वच्छता कर्मचाऱ्यांना नागपूर महानगरपालिकेने नियुक्तीपत्रे देण्यासोबतच त्यांच्यासाठी मोफत घरकुल देण्याची योजना राज्यात सर्वात प्रथम राबविली आहे. ३०० चौरस फुटांच्या मोफत घरांसोबतच अधिकच्या बांधकामासाठी अतिरिक्त शुल्क भरल्यास मोठे घर देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे यावेळी सांगताना मुख्यमंत्री म्हणाले की, शहर स्वच्छ राहावे, आरोग्य चांगले राहावे, यासोबतच स्वच्छता दूतांच्या जीवनात परिवर्तन सुद्धा घडविण्यासाठी विशेष योजना राबविण्यात येत असल्याचे त्यांनी यावेळी जाहिर केले. नागपूर शहराचा वेगाने होत असलेला विकास व त्यासोबतच पायाभूत सुविधा, उंच इमारती यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळाची आवश्यकता लक्षात घेऊन महानगरपालिकेने स्वच्छतेच्या दृष्टीने प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी सफाई कामगारांच्य पाल्यांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण सुरू करावे, अशी सूचना त्यांनी यावेळी केली.

महानगरपालिकेच्या ऐतिहासिक हिरवळीवर राष्ट्रपतींसह अनेक मान्यवर व कलावंतांचे सत्कार समारंभ येथे आयोजित करण्यात आले आहेत. ही हिरवळ म्हणजे महानगरपालिकेच्या इतिहासाची साक्ष आहे. महापौर म्हणून व त्यापूर्वीही अनेक समारंभांना उपस्थित राहण्याचे भाग्य मला लाभले आहे. त्यामुळे महानगरपालिकेचा कार्यक्रम हिरवळीवरच आयोजित करावा, अशी सूचना केली होती. त्याअनुषंगाने या कार्यक्रमाचे आयोजन होत असल्याचे तसेच येथील कार्यक्रमांच्या स्मृतींना यावेळी मुख्यमंत्र्यांनी उजाळा दिला. अध्यक्षीय भाषणात केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी म्हणाले की, शहराच्या विकासासोबतच स्वच्छता, खेळाचे मैदान व नागरिकांसाठी मुलभूत सुविधांचा विकास करताना येथील स्वच्छतेला प्राधान्य देण्याची आवश्यकता व्यक्त केली. नवनियुक्त कर्मचाऱ्यांना पारदर्शक व गतीमान प्रशासन देण्याची आवश्यकता व्यक्त करताना प्रत्येक प्रभागामध्ये खेळाची मैदाने २४ तास पाणीपुरवठा तसेच बेरोजगार युवकांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षणाला प्राधान्य द्यावे, अशी सूचना त्यांनी यावेळी केली. प्रारंभी महापौर नीता ठाकरे यांनी स्वागत करून प्रास्ताविकामध्ये शहराच्या स्वच्छतेसाठी आवश्यक असलेल्या स्वच्छतादुतांच्या नियुक्त्यांसाठी विशेष सहकार्य केल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस व केंद्रीय मंत्री गडकरी यांचे आभार मानले. आपली बस ही सेवा अधिक लोकाभिमुख व्हावी, यादृष्टीने व्हॉट्स ॲपद्वारे बसचे तिकीट देण्याचा शुभारंभ होत असल्यामुळे शहर अधिक स्मार्ट होणार असून स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी घरकुल योजना राबविण्यात येत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. उपमहापौर लिना हाथीबेड यांनी आभार मानले. मनिष सोनी यांनी सूत्रसंचालन केले.

### पाटोदा जिल्हा...

जोशी, महिला पालक प्रतिनिधी सौ. मनिषाताई जोशी, विद्यार्थी प्रतिनिधी चि. रुद्रांश जोशी, सौ. पुष्पांजली वानोळे, श्री संतोष वागदकर, सौ. रंजना हूरदुके, श्री जनार्धन धुमाळे यांच्यासह शिक्षण, सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

### अवघी दुमदुमली...

हा सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण व संस्मरणीय ठरला. संपूर्ण शालेय परिसर विठ्ठल नामाच्या गजराने दुमदुमून गेला आणि भक्तीमय माहोल अनुभवायला मिळाला.

### महाराष्ट्राच्या मातीतील...

आत्मविश्वास वाढतो आणि जिल्ह्याची क्रीडा चळवळ अधिक बळकट होते.''

यावेळी जिल्ह्यातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडू, प्रशिक्षक आणि पंचांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन दिमाखदार सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात सर्व सन्मानार्थींचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे संयोजक तथा जिल्हा कबड्डी असोसिएशनचे जिल्हा सचिव डॉ. प्रशांत सोपानराव तेलगड यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे अन्वर मिर्झा, रिंकल तयाड, वंदना खांडेभराड, शीतल बारोटे तसेच शिवसेनेचे शुभम टेकाळे, संतोष मोहिते यांच्यासह जिल्ह्यातील क्रीडाप्रेमी, खेळाडू, प्रशिक्षक, नागरिक आणि विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वारकऱ्यांच्या मागण्यांसाठी आषाढी एकादशीला पंढरपूर येथे ‘वारकरी महाअधिवेशन’ !

# वारकरी संप्रदाय आणि हिंदु धर्म यांच्यात फूट पाडण्याचे कटकारस्थान करणाऱ्यांच्या विरोधात संघटित होण्याचा निर्धार!

पंढरपूर - वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राचा कणा असून महाराष्ट्र जोडण्याची शक्ती या संप्रदायात आहे. काही निधर्मी, डावे, पुरोगामी त्याला खिळखिळा करण्याचा प्रयत्न करत आहेत. वारकरी संप्रदाय हा सर्वसमावेशक असून त्याने वेळोवेळी समाजाला दिशा देण्याचे काम केले आहे. धर्मनिष्ठ अशा वारकरी संप्रदायात वारकरी आणि हिंदु धर्म वेगळा असा भासवण्याचे षडयंत्र चालू आहे. वारकरी संप्रदाय आणि हिंदु धर्म यांच्यात फूट पाडण्याचे कटकारस्थान करणाऱ्यांच्या विरोधात संघटित होण्याचा निर्धार वारकरी महाअधिवेशनात करण्यात आला. वारकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी सद्गुरु श्री गंगागिरी महाराज मठ येथे २५ जुलैला वारकरी महाअधिवेशन आयोजित केले होते. त्या अधिवेशनात हा निर्धार व्यक्त करण्यात आला. ‘श्री क्षेत्र गोदावरी धाम बेट सरला’चे महंत गुरुवर्य प.पू. रामगिरी महाराज यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या अधिवेशनासाठी १००० पेक्षा अधिक वारकरी भाविक उपस्थित होते. सूत्रसंचालन हिंदु जनजागृती समितीचे श्री. धनंजय बोकडे यांनी केले, तर श्री. विनोद रसाळ यांनी अधिवेशनाचा उद्देश स्पष्ट केला.

या अधिवेशनात वारकरी संप्रदायातील हिंदुत्वासाठी कार्य करणारे ह.भ.प. आणि पूजनीय संत यांना ‘घुसखोर’ संबोधून त्यांचा अवमान करणाऱ्या तथाकथित पुरोगाम्यांचा जाहीर निषेध करण्यात आला, तसेच हिंदुत्वनिष्ठ, संत यांचा ज्ञानेश्वर माऊलींची मूर्ती देऊन जाहीर सन्मान करण्यात आला. संत सोपानकाका सहकारी बँकेचे अध्यक्ष, भाजप महाराष्ट्र प्रदेश सचिव माजी आमदार संजय जगताप यांनी २० ज्ञानेश्वर माऊलींच्या मूर्ती उपस्थितांना भेट देण्यासाठी अर्पण म्हणून दिल्या. या प्रसंगी इंचगिरी मठाचे मठाधिपती सुदर्शन महाराज, राष्ट्रीय वारकरी परिषदेचे ह.भ.प. रामदास महाराज चौधरी, ह.भ.प. दत्तात्रय चोरगे महाराज यांसह विविध




मान्यवर उपस्थित होते.

विशेष सन्मान - हुपरी (कोल्हापूर) येथे निवेदन, तसेच विविध मार्गाने आंदोलन करून अवैध मदरसा तोडण्यास भाग पाडणारे श्री. नितीन काकडे, पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणीदेवी मंदिरातील श्री विठ्ठलाच्या मूर्तीच्या रासायनिक लेपनाच्या विरोधात न्यायालयीन लढा देणारे श्री. गणेश लंके, गोरक्षणाच्या कामात सातत्याने काम करणारे राष्ट्रीय वारकरी सेनेचे उपाध्यक्ष ह.भ.प अंभोरे महाराज कारभारी यांचा संत ज्ञानेश्वर माऊलींची मूर्ती देऊन विशेष सन्मान करण्यात आला.

हिंदूंनी इतिहासबोध, शत्रूबोध लक्षात घेऊन हिंदु धर्मावर होणाऱ्या आघातांच्या विरोधात कृतीशील होणे आश्यक ! - प.पू. रामगिरी महाराज

हिंदू इतिहासातून शिकत नाहीत आणि आपण संघटित नाही त्यामुळेच अनेक आक्रमकांनी आपल्यावर राज्य केले. धर्मावर होणाऱ्या आघातांविषयी आपण जागृत नसल्याने आज अन्य धर्मिय आिण चुकीचे विचार पसरवण्याचे फावते आहे. वारकरी संप्रदाय हा जगाला देण्याचे, जोडण्याचे काम काम करतो अशा वारकरी संप्रदायाविषयी आज भ्रमित करणारे विचार पसरवले जात आहेत, ‘समता’ दिंडी काढली जात आहे. आज काही जण पंढरपूरचा पांडुरंग हा विठ्ठल नसून अन्य कुणी असल्याचे सांगत आहे. जगात धर्म एकच असून तो म्हणजे सनातन धर्म आहे. लोकांना आज हिंदु धर्माचे महत्त्व न समजल्याने ते अन्य धर्मात जात आहेत. ‘लव्ह जिहाद’चे लोण आता प्रत्येक खेड्यापाड्यापर्यंत पोचले आहे. लहान मुलांनाचही बुद्धीभेद करून त्यांना इस्लामच्या प्रार्थना शिकवल्या जात आहेत. गोवंश रक्षणाच्या संदर्भात सरकारने मे महिन्यात एक अध्यादेश काढला असून जर एखाद्या परिसरात अवैधरितीने गोहत्या झाल्यास त्याला पोलीस, तहसीलदार, प्रशासन तितकेच उत्तरदायी आहेत ! हे लक्षात घेऊन आपण प्रशासनास गोहत्या थांबवण्यासाठी भाग पाडले पाहिजे.''वारकरी संप्रदायात घुसलेले खरे घुसखोर कोण ही सांगण्याची आता वेळ आली आहे ! - सुनील घनवट, महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्य संघटक, हिंदु जनजागृती समिती संघटित असलेल्या वारकरी संप्रदायात हेतूपुरस्सर दुफळी पाडण्याचे त्यांचा जाणीवपूर्वक बुद्धीभेद करण्याचे काम चालू आहे. श्री विठ्ठलाची भक्तीचे वर्णन करणारे जगद्गुरु तुकाराम महाराज यांचे अनेक अभंग असतांना जाणीवपूर्वक ‘अल्लाशिवाय कुणी श्रेष्ठ नाही’, ‘अल्ला दिलावे-अल्ला खिलावे’, अशा प्रकारची केवळ एकांगी प्रसार करणारे फलक वारीच्या वाटेवर लावले जात आहेत. हे षड्यंत्र आपण वेळीच ओळखून हे हाणून पाडले पाहिजे. वारकरी संप्रदायात वारकरी संप्रदायात घुसलेले खरे घुसखोर कोण आहेत हे सांगण्याची आता वेळ आली आहे. महाराष्ट्रासाठी वारकरी संप्रदाय प्राण असून हिंदु धर्म आत्मा आहे ! देहलीतील कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनात ‘पेपरफुटीच्या विरोधात चालू असलेल्या आंदोलनाच्या नावाखाली पोलिसांच्या गाड्या फोडण्यात आल्या, पोलिसांवर आक्रमण करण्यात आले. तिथे दंगलसदृष्य परिस्थिती होती. यात देशविरोधी घोषणा देण्यात आल्या. हे देशविरोधी षडयंत्र आपण लक्षात घेऊन त्याविरोधात कृती करण्याचा निर्धार केला पाहिजे.''

विहिपचे ह.भ.प. नारायण महाराज शिंदे म्हणाले , ‘‘वारकऱ्यांच्या भोळेपणाला लाभ घेऊन काही लोक त्यांना निरनिराळ्या प्रकारची अमिषे दाखवून त्यांचा बुद्धीभेद करण्याचा प्रयत्न करतात. तरी यापुढील काळात वारकरी संप्रदायात घुसलेले कीर्तनकार शोधून काढून त्यांना समोर आणणे आवश्यक आहे!'' राष्ट्रीय वारकरी परिषदेचे प्रवक्ते ह.भ.म. महेंद्र महाराज म्हस्के म्हणाले, ‘‘सध्या देव, देश, धर्म यांच्यापुढे अनेक मोठी आव्हाने आहेत. संप्रदायासाठी काम करणारे अनेक लोक धर्माच्या व्यासपीठावर येऊन त्यांचे मत व्यक्त करण्यास घाबरतात; मात्र प.पू. वक्ते महाराज यांनी सांगितल्याप्रमाणे अगोदर आपण वैदिक सनातन हिंदू आहोत मग वारकरी आहोत’, हे नेहमी लक्षात ठेवावे लागेल.

राष्ट्रीय वारकरी परिषदेचे प्रवक्ता ह.भ.प. निवृत्ती महाराज हल्ल्याळीकर म्हणाले, ‘‘महाराष्ट्र सरकारने गोवंश हत्याबंदी कायदा लागू केला; मात्र हा कायदा कठोर केला पाहिजे. सर्व तीर्थक्षेत्रे मद्यमांस मुक्त केली पाहिजेत. इंद्रायणी, चंद्रभागा या नद्या स्वच्छ झाल्या पाहिजेत.''

विश्व हिंदु परिषदेचे केंद्रीय सहमंत्री श्री. दादा वेदक म्हणाले, ‘‘देव, देश, धर्म यांवर होणाऱ्या आघातांच्या विरोधात वारकऱ्यांनी आवाज उठवला पाहिजेत. वारकरी संप्रदायाची, भक्ती, समर्पण, त्याग कुठेही अल्प होता कामा नये ! वारकरी संप्रदाय समाजमूल्य जतन करण्यासाठी सतत प्रयत्न करत आहे. सध्या कुटुंबसंस्था, विवाहसंस्था यावर घाला घालण्याचे काम चालू असून समाज आणि राष्ट्र यांना जोडणारा दुवा कुटुंबव्यवस्था आदर्श म्हणून उभा केला पाहिजे. हिंदू कुटुंबाने त्यांचा एकतरी मुलगा धर्माच्या कामासाठी दिला पाहिजे !

राष्ट्रीय वारकरी परिषदेचे अध्यक्ष ह.भ.प. मारुति महाराज तुनतुने-शास्त्री म्हणाले, ‘‘अन्य धर्मिय संघटित असल्याने त्यांचा प्रत्येक मागण्यांची नोंद शासनाला घ्यावी लागते, तर हिंदू संघटित नसल्याने आज हिंदु धर्मावर आघात होत आहेत. गोमातेला राजमातेचा दर्जा असतांना पशूवधगृहाची अनुमती दिली जाते, दे दुर्दैवी आहे.''

प्रज्ञापुरी ज्ञानपीठ अक्कलकोटचे पीठासीन धर्माधिकारी श्री. प्रसाद पंडित म्हणाले, ‘‘वज्रलेपनच्या संदर्भात फोलपणा माहिती असूनही जाणीवपूर्वक मंदिर समितीने वज्रलेप करण्याचा अट्टाहास केला. याला मंदिर महासंघासह वारकरी संप्रदायाने पत्रकार परिषद घेऊन यातील फोलपणा समोर आणला, तसेच न्यायालयीन लढाईद्वारे याला स्थगिती मिळवली.''

**विविध ठरावांचा ‘हर हर महादेव’च्या गजरात पाठिंबा !**

पंढरपूर येथील पुरातत्व विभागाच्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील रासासयनिक लेपन प्रक्रिया या धर्मविरोधी निर्णयाच्या विरोधात वारकरी आणि मंदिर महासंघ यांनी लढा दिला आणि यापुढील काळात कोणत्याही प्रकारची रासायनिक लेपन प्रक्रिया करू नये, संत, संत-वांङ्मय, राष्ट्रपुरुष, धर्म, देवता आदींचा अवमान करणाऱ्यांवर कठोर कारवाई होण्यासाठी ईशनिंदा प्रतिबंधक कायदा लागू करावा, प्रस्तावित ‘महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियम २०२६’ स्थगित असून यापुढे सरकारने देवभूमीचे रक्षण करणारा ‘देवस्थान भूमी संरक्षण कायदा’ लागू करावा यांसह करण्यात आलेल्या विविध ठरावांना वारकरी-भाविक यांनी ‘हर हर महादेव’च्या गजरात पाठिंबा दिला.

# पेपर लीक प्रकरण फास्ट ट्रॅकने चालणार याचे स्वागत;परंतु शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधानांचे काय?

सरकारने लक्षात ठेवले पाहिजे की,एकटा धर्मेंद्र प्रधान म्हणजे देश होत नाही,तर देशाची १४५ कोटी जनता म्हणजे देश होतो.कारण देशातील जनता यांना देश सेवा करण्यासाठी लोकप्रतिनिधीच्या रूपात लोकसभेत पाठवित असतो आणि त्यांच्या भावना दुखावणे म्हणजे महा पाप समजल्या जाते.ज्या व्यक्तीमुळे आंदोलनाचे जहर देशभर पसरले आणि ज्या व्यक्तीमुळे आंदोलनाला सुरुवात झाली आणि देशाचे करोडो रूपयांचा चुराडा झाला,आंदोलना दरम्यान शेकडो विद्यार्थी गंभीर जखमी झाले आणि शिक्षणप्रणालीचा ज्यानी सत्यानाश केला अशा धर्मेंद्र प्रधानला पदावर रहाण्याचा तिळमात्र अधिक नाही.अशा व्यक्तीचा सरकार राजीनामा न घेता त्याला खुर्चीला चिकटून ठेवतात यावर प्रधानमंत्री बोलण्यास तयार नाही किंवा राजीनामा घेण्यास तयार नाही ही कुठली लोकशाही आणि कसली सरकार म्हणावी!शनिवार व रविवारला मोर्चा स्थळी लाखोंच्या संख्येने विद्यार्थी येऊ शकतात हे लक्षात घेता मेट्रो सेवा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला व इंटरनेट सेवा सुध्दा बंद ठेवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.यामुळे देशाचे किती नुकसान होत आहे याचा विचार पंतप्रधान का करीत नाही? सरकारला मेट्रो किंवा अन्य वाहतूक बंद करणे चालते परंतु विद्यार्थ्यांना न्याय देण्याचे चालत नाही ही कुठली नितीमत्ता म्हणावी!आज विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ पुरा देश पेटून उठला आहे आणि जगभरात विद्यार्थी आंदोलनाची चर्चा मोठ्या प्रमाणात सुरू आहे तरीही धर्मेंद्र प्रधानचे लाड सरकार करीत आहे ही स्वतंत्र भारताची शोकांतिका म्हणावी लागेल.यामुळे देशातील जनतेला शंका आहे की, सरकार सत्तेचा दुरुपयोग तर करत नाही ना!आंदोलना दरम्यान असे लक्षात आले की,सरकारच्या नाकावरील माशीही उडणार नाही अशी परिस्थिती अनेक खासदारांच्या लक्षात आली व विविध पक्षातील ६५ खासदारांच्या विनंती वरून २६ दिवसांनंतर सोनम वांगचुक यांनी आपले उपोषण सोडले याचे मनापासून स्वागत कारण आज वांगचुक सारख्या शिक्षणतज्ज्ञाची देशाला नितांत गरज आहे.फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून पेपर फुटी व गैरप्रकारांशी संबंधित फौजदारी खटल्याच्या सुनावणीसाठी दिल्ली उच्च न्यायालयाने विशेष जलदगती न्यायालयाची नियुक्ती केली आहे.न्यायिक अधिकारी अनू ग्रोव्हर बालिगा सुनावणी घेतील. तत्पूर्वी, पेपरफुटीच्या घटनांबाबत संबंधित अधिकारी व यंत्रणांना आवश्यक ती सर्व पावले तातडीने उचलण्याचे निर्देश दिल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले.माननीय प्रधानमंत्री सर्वप्रथम फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्राचे गुन्हेगार धर्मेंद्र प्रधान यांच्यावर कारवाई का करीत नाही? सरकारने जंतर मंतरच्या २ किलोमीटरच्या परिसरात मोबाईल इंटरनेट सेवा बंद केली आहे.इतकेच नाही तर दिल्लीतील मेट्रो सेवा रात्री उशिरा सुरू करण्यात आली आणि शनिवारी व रविवारला बंद राहू शकते.मंगळवारपासून पंतप्रधान निवासस्थानाची सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे.केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या निवासस्थानाबाहेर कलम १६३ लागू करण्यात आले आहे.हा सर्वा खर्च, वेळ आणि सर्वसामान्य नागरिकांना त्रास हा सर्व प्रकार धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा न दिल्यामुळे होत आहे याची कल्पना सरकारला असुन सुद्धा धर्मेंद्र प्रधानचा राजीनामा सरकार घेत नाही किंवा त्यांना बर्खास्त करीत नाही. यावरून असे वाटते की,देश म्हणजे स्वतःची जागीर समजतात की काय असे स्पष्ट दिसून येते आणि राजीनाम्यावर नरेंद्र मोदी सुध्दा मौन धारण करून आहे.देशात हे चाल्लय तरी काय हे कळायला मार्गच रहाला नाही.सरकारने लक्षात ठेवले पाहिजे की धर्मेंद्र प्रधान म्हणजे देश नाहीच.१४५ कोटी देशाची जनता म्हणजे देश होतो.सरकारने धर्मेंद्र प्रधान यांच्या गुन्ह्यावर व राजीनाम्यावर पांघरूण घालण्यासाठी काही कारण नसताना एनटीए च्या ४७ अधिकाऱ्यांना हटविण्यात आले ही सर्व लौटनकी एकट्या धर्मेंद्र प्रधानला वाचविण्यासाठी सुरू असल्याचे दिसून येते.प्रधानमंत्री मुख्य मागणी बाजुला सारुन पळवाटा काढतांना दिसत आहे.आज ढासळत्या शिक्षणप्रणाली बद्दल आवाज उठविण्यासाठी संपूर्ण देश एकवटला आहे आणि सरकार व माननीय प्रधानमंत्री धर्मेंद्र प्रधानला वाचविण्यासाठी पळवाटा काढत आहे ही बाब लोकशाहीला घातक ठरू शकते.कारण धर्मेंद्र प्रधानच्या चुकीच्या निर्णयामुळेच देशातील विद्यार्थ्यांना आज कठीण परिस्थितीतुन जावे लागत आहे आणि जे शिक्षा क्षेत्रातील खरे गुन्हेगार आहे त्यांना वाचवण्यासाठी सरकार सर्व शक्तीनिशी प्रयत्न करीत आहे हे देशाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.माझे सरकारला एकच म्हणणे आहे की,पक्ष-विपक्षांचे राजकारण बाजूला सारून विद्यार्थ्यांच्या(सीजेपीच्या) संपूर्ण मागण्यावर सरकारने ताबडतोब अंमलबजावणी केली पाहिजे यातच सरकारची खरी जीत राहील.



**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# जि.प.केंद्रशाळा जळगांव सपकाळची विठुच्या गजरात भव्यदिंडी



**जळगांव सपकाळ -प्रतिनिधी**
आज भोकरदन तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा जळगाव सपकाळ उपक्रमशील शाळा असून आषाढी एकादशीच्या निमित्ताने गावात भव्यदिंडी काढली असून विद्यार्थ्यांनी विठ्ठल -रुक्मिणी तुकोबाज्ञानोबांची वेशभूषा साकारली. छ.शिवाजी महाराज स्मारक परिसरात नृत्याविष्कार दाखविला. स्वरचित अभंग, पारंपरिक अभंग,भजनांनी मंत्रमुग्ध केले.विठ्ठल दौड, विष्णू बुरकूले, नायबराव पुंगळे श, शेषराव सपकाळ, रामभाऊ बुरकूले यांच्यासह हरीफुगडीचा आनंद घेतला.अनेक महिलांनी विठ्ठल रुक्मिणीच्या पालखीचे दर्शन करत दिंडीचे स्वागत केले. विठूच्या गजरात गाव धुमधमावून गेले..या भव्य दिंडीचे केंद्रप्रमुख श्री श्याम सवडतकर,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री गोकुळभाऊ सपकाळ उपाध्यक्ष श्री रामेश्वर दौड, व सर्व सदस्य तसेच सर्व ग्रामस्थांनी कौतुक केले.शाळेचे मुख्याध्यापक श्री नासेर शेखसर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विद्यार्थी आणि शिक्षकवृंदांनी परिश्रम घेतले.

# टेंभुर्णी येथील बरड वस्तीवरील चिखलमय रस्त्यांमुळे शाळकरी मुलांचे हाल; प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष

आज काय टेंभुर्णीचा विकास नागरिकांच्या संतप्त प्रतिक्रिया



**दत्ता देशमुख**
पावसाळा सुरु होताच ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरवस्था आणि त्यामुळे शाळकरी विद्यार्थ्यांना सहन करावा लागणारा त्रास पुन्हा एकदा समोर आला आहे. टेंभुर्णी जवळील बरड वस्ती येथील मुख्य रस्ता पूर्णपणे चिखलमय झाला असून, विद्यार्थ्यांना दररोज चिखलातून वाट काढत शाळेत जावे लागत आहे. बरड वस्तीच्या मुख्य रस्त्यावर ठिकठिकाणी पाण्याचे मोठे डबके साचले असून, संपूर्ण रस्ता चिखलाने माखला आहे. रस्त्यावरुन चालताना पाय घसरुन मुले पडण्याची आणि त्यांना दुखापत होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. शाळेत पोहोचण्यापूर्वीच मुलांचे कपडे आणि बूट चिखलामुळे खराब होत आहेत, ज्यामुळे त्यांना मानसिक त्रासाला सामोरे जावे

**प्रशासनाने मुलांच्या भविष्याशी न खेळता रस्ता तातडीने दुरुस्त करावा-मुगूटराव**

मुलांना शाळेत पाठवताना आम्हाला दररोज काळजी लागून राहते. चिखलामुळे मुले अनेकदा घसरुन पडतात, त्यांचे कपडे-बूट खराब होतात आणि त्यांना नाहक त्रास सहन करावा लागतो. आमच्या मुलांच्या या त्रासाकडे कोणाचेच लक्ष नाही. प्रशासनाने आमच्या मुलांच्या भविष्याशी खेळू नये आणि हा रस्ता तातडीने दुरुस्त करावा, अशी मागणी टेंभुर्णी येथील शुभम मुगूटराव यांनी केली आहे.

लागत आहे. संबंधित प्रशासनाने या रस्त्याच्या दुरुस्तीकडे आणि खडीकरणाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे. बरड वस्तीतील मुलांचा शाळेचा प्रवास सुरक्षित व्हावा, यासाठी प्रशासनाने या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी येथील ग्रामस्थ आणि पालकांनी केली आहे.

# राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल, टेंभुर्णी येथे विद्यार्थ्यांसमवेत आषाढी एकादशी उत्साहात साजरी



**दत्ता देशमुख**
राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल, टेंभुर्णी येथे आषाढी एकादशीचा पवित्र सण मोठ्या भक्तिभावाने व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे जतन व विद्यार्थ्यांमध्ये आध्यात्मिक, नैतिक आणि सामाजिक मूल्यांची जपणूक व्हावी या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा संस्थापक अध्यक्ष मा. संजयजी लहाने सर यांच्या हस्ते भगवान श्री विठ्ठल-रुक्मिणी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषा परिधान करून टाळ-मृदंगाच्या गजरात ‘‘ज्ञानोबा-तुकाराम‘‘च्या जयघोषात दिंडी काढली. यावेळी विद्यार्थ्यांनी संत तुकाराम महाराज व संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या अभंगांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीचे धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व स्पष्ट करणारी भाषणे सादर केली. तसेच भक्तिगीते, नृत्य आणि विठ्ठल भक्तीवर आधारित विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी कार्यक्रमाची शोभा वाढविली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वारकरी संप्रदायाचा इतिहास, संतपरंपरा आणि भक्ती, समता, सेवा व सदाचार या मूल्यांचे महत्त्व समजावून सांगितले.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी समाजात बंधुभाव, सद्भावना आणि संस्कार जपण्याची प्रतिज्ञा केली.

# मसिआच्या महिला विंगतर्फे विविध मार्गदर्शन कार्यशाळा उत्साहात संपन्न!

**वाळूज महानगर -प्रतिनिधी** : मराठवाडा असोसिएशन ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर () च्या महिला विंगतर्फे महिला उद्योजकांना आर्थिक व्यवस्थापन, कर प्रणाली आणि डिजिटल तंत्रज्ञानाबाबत सक्षम करण्याच्या उद्देशाने या विषयावरील विशेष मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन काल गुरुवार, दि. २३ जुलै २०२६ रोजी वाळूज कार्यालयात करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या सीए श्रद्धा कचेश्वर यांची उपस्थिती लाभली. अध्यक्ष श्री गजानन देशमुख, संयोजिक पल्लवी दलाल व सहसंयोजिका सोनल भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी अध्यक्ष श्री गजानन देशमुख म्हणाले की आजच्या स्पर्धात्मक व्यावसायिक वातावरणात प्रत्येक उद्योजकाने व्यवसायातील आर्थिक व्यवस्थापन, लेखांकन आणि जीएसटीचे अद्ययावत ज्ञान आत्मसात करणे अत्यंत आवश्यक आहे. महिलांनी उद्योग-व्यवसायात अधिक सक्षमपणे पुढे यावे, या उद्देशाने मसिआ महिला विंगने आयोजित केलेला हा मार्गदर्शन कार्यक्रम निश्चितच उपयुक्त ठरला आहे. भविष्यातही अशा ज्ञानवर्धक उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येईल असे म्हणाले. या विषयावरील मार्गदर्शन कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला, ही आनंदाची बाब आहे. या कार्यक्रमातून सहभागी उद्योजिका आणि व्यावसायिक महिलांना व्यवसायातील लेखांकन, करप्रणाली आणि आर्थिक नियोजनाविषयी व्यावहारिक मार्गदर्शन मिळाले. भविष्यातही महिलांच्या उद्योगवृद्धीसाठी आणि कौशल्य विकासासाठी अशाच उपयुक्त कार्यशाळा व मार्गदर्शन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येईल असे मसिआ महिला विंग संयोजक पल्लवी दलाल म्हणाल्या. कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या सीए श्रद्धा कचेश्वर यांनी व्यवसायामध्ये अचूक लेखा व्यवस्थापनाचे महत्त्व, व्यवसायातील आर्थिक शिस्त, जीएसटीची मूलभूत संकल्पना, रिटर्न भरण्याची प्रक्रिया, इनपुट टॅक्स क्रेडिट, कर अनुपालन, आर्थिक नियोजन, कायद्यातील अलीकडील बदल तसेच लघु व मध्यम उद्योगांनी घ्यावयाची आवश्यक काळजी याबाबत अत्यंत सोप्या आणि उदाहरणांसह मार्गदर्शन केले. व्यवसाय वाढीसाठी योग्य आर्थिक नियोजन आणि पारदर्शक लेखा पद्धती किती महत्त्वाच्या आहेत, यावरही त्यांनी विशेष भर दिला. प्रश्नोत्तर सत्रात उपस्थितांनी विविध शंकांचे निरसन करून घेतले. या कार्यक्रमाला मिलिंद जोशी आणि मोहिनी जोशी, - यांचे प्रायोजकत्व लाभले. यावेळी त्यांनी '' '' या विषयावर माहिती देताना उद्योगांमध्ये डिजिटल दस्तऐवज व्यवस्थापनाची वाढती गरज, कागदविरहित कार्यालय संकल्पना, महत्त्वाची कागदपत्रे सुरक्षित पद्धतीने जतन करणे, विविध विभागांतील कार्यप्रवाह () अधिक कार्यक्षम बनविणे, माहिती सहज उपलब्ध करून देणे आणि डिजिटल तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उद्योगांची उत्पादकता व कार्यक्षमता वाढविण्याबाबत सविस्तर माहिती दिली.


महिला उद्योजकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमामध्ये आर्थिक साक्षरता आणि डिजिटल परिवर्तन या दोन्ही महत्त्वपूर्ण विषयांचा समन्वय साधण्यात आला. व्यवसायाच्या वाढीसाठी आधुनिक लेखा प्रणाली, कर नियमांचे पालन आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर ही काळाची गरज असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

उपस्थित महिला उद्योजिकांनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत अशा प्रकारचे व्यावहारिक ज्ञान देणारे कार्यक्रम नियमितपणे आयोजित करण्याची अपेक्षा व्यक्त केली. उद्योग क्षेत्रातील महिलांना सक्षम, आत्मनिर्भर आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी महिला विंग सातत्याने विविध प्रशिक्षण, कार्यशाळा, उद्योगभेटी व मार्गदर्शन कार्यक्रमांचे आयोजन करीत असून भविष्यातही अशाच उपक्रमांची मालिका सुरू राहणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यक्रमाचे प्रायोजक मिलिंद जोशी आणि मोहिनी जोशी ( ), प्रमुख वक्त्या सीए श्रद्धा कचेश्वर, तसेच उपस्थित सर्व महिला उद्योजिका, सदस्य आणि सहकाऱ्यांचे महिला विंगतर्फे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

यावेळी सदरील कार्यशाळेसाठी अध्यक्ष श्री गजानन देशमुख, प्रसिद्धी प्रमुख श्री मंगेश नीटूरकर, कार्यकारिणी सदस्य श्री श्रीकांत सूर्यवंशी यांची तर महिला विंग मधून पल्लवी दलाल-संयोजिका, सोनल भोसले-सहसंयोजिका, सौ. रत्नप्रभा शिंदे, सौ. सुनीता राठी, सौ. सारिका किर्दक, सौ. मनीषा मंगलगे, सौ. अपूर्वा भुसारी, सौ. प्रियंका वाबळे, सौ. जया पवार, सौ. कल्पना काळे, सौ. वर्षा लोया, यांची उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनीता मोगल यांनी केले.

## रुद्रांश भाले यांनी साकारली वारकऱ्याची वेशभूष

**दत्ता देशमुख**



आषाढी एकादशी निमित्त. वारीची परंपरा आणि संस्कृती लहान वयातच कळावी म्हणून टेंभुर्णी येथील भाले परिवारातील चिमुकला रुद्रांश सुनील भाले याने अतिशय सुंदर वारकरी वेशभूषा केली आहे.डोक्यावर पांढरी टोपी, कपाळावर बुक्का आणि चंदनाचा टिळा, गळ्यात तुळशीची माळ आणि हातात विठ्ठलाची भगवी पताका घेऊन रुद्रांश भाले साक्षात पंढरीचा बाल वारकरी वाटत आहे . त्याने घरातच ज्ञानबा-तुकाराम आणि विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठलचा गजर करत विठूरायाचे दर्शन घेतले.

**(छायाचित्र राज भाले )**




जालना येथे आषाढी एकादशी निमित्त आनंद स्वामी महाराज पालखी मिरवणूक काढण्यात आली होती यावेळी मोठ्या संख्येने दर्शन घेण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती (छाया /जावेद तांबोली

# पाटोदा जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षकांना मराठवाडा आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

## हा पुरस्कार पाटोदा शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना अर्पण - प्राथमिक शिक्षक वानोळे

**मंठा - प्रतिनिधी**

आपुलकी व आस्था सेवाभावी संस्था, सेलू यांच्या वतीने रविवार, २६ जुलै २०२६ रोजी सेलू येथील साई नाट्य मंदिरात ''मराठवाडा आदर्श शिक्षक पुरस्कार व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा'' उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्याचे माजी शिक्षण संचालक मा. श्री गोविंद नांदेडे हे होते. उद्घाटक म्हणून सेलू नगर परिषदेचे नगराध्यक्ष मा. श्री मिलिंद (दादा) सावंत उपस्थित होते. तसेच परभणीचे शिक्षणाधिकारी (योजना) मा. श्री संजय ससाने, डॉ. अशोक नाईकनवरे, संस्थेचे अध्यक्ष श्री शिवशंकर मोरे यांच्यासह शिक्षण, सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.




पाटोदा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे प्राथमिक शिक्षक श्री गंगाधर वानोळे यांना शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल ''मराठवाडा आदर्श शिक्षक पुरस्कार'' प्रदान करून गौरविण्यात आले.

पाटोदा जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी सलग दोन वर्षे विविध स्पर्धा परीक्षांमध्ये गोल्ड मेडलच्या स्वरूपात मिळवलेले यश, ''माझा जिल्हा आणि मी'', ''चला महाराष्ट्र समजून घेऊया'', ''अध्ययन-अध्यापनात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर'', ''आनंददायी शनिवार'' यांसारख्या उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत झालेली लक्षणीय वाढ, पालकांच्या मानसिकतेत झालेला सकारात्मक बदल तसेच शाळेच्या वाढत्या विद्यार्थी पटसंख्येची दखल घेऊन हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी बोलताना पुरस्कारप्राप्त शिक्षक श्री गंगाधर वानोळे म्हणाले, ''हा सन्मान केवळ माझा नसून शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक, पालक, वरिष्ठ अधिकारी, सहकारी शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित आहे. त्यांच्या सहकार्यामुळे पाटोदा जिल्हा परिषद शाळेचा नावलौकिक वाढत आहे. हा पुरस्कार पाटोदा गाव व शाळेचा असून तो मी पाटोदा शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना अर्पण करीत आहे.''

या प्रसंगी पाटोदा शाळेचे पालक प्रतिनिधी श्री मारोतीराव *(पान २ वर)*

# आषाढी एकादशी निमित्त भाविकांना साबुदाणा खिचडीचे वाटप

**जालना । प्रतिनिधी**

सामाजिक कार्यकर्ते भास्कर अण्णा रत्नपारखे मित्र मंडळाच्या वतीने आषाढी एकादशी निमित्ताने शनिवारी ( दि. २५)भाविकांना साबुदाणा खिचडीचे वाटप करण्यात आले.




भास्कर अण्णा रत्नपारखे मित्र मंडळातर्फे गेल्या सहा वर्षापासून आषाढी एकादशीनिमित्त श्री आनंदी स्वामी महाराज यांच्या पालखी सोहळ्यानिमित्त भरणाऱ्या यात्रेत भाविकांना साबुदाणा खिचडीचे वाटप करण्यात येत आहे. शनिवारी माजी आमदार कैलास गोरंट्याल, महापौर वंदनाताई मगरे, नगरसेवक अक्षय गोरंट्याल यांच्या हस्ते साबुदाणा खिचडीचे वाटप करण्यात आले. यावेळी भास्कर अण्णा रत्नपारखे, सामाजिक कार्यकर्ते सचिन कांबळे, मनोज इंगळे,रवी खरात अमोल रत्नपारखे प्रदीप रत्नपारखे, दीपक खरात, अमोल रत्नपारखे ,विनोद रत्नपारखे, महिंद्र रत्नपारखे, प्रवीण रत्नपारखे, संतोष खरात, लक्ष्मण जाधव ,गौतम रत्नपारखे ,दत्ता आसळकर, कपिल खरात, सिद्धू हिवाळे ,सोमेश्वर मुंडे, पवन वाहूळ, अरविंद रत्नपारखे, रावसाहेब रत्नपारखे ,बाबासाहेब साळवे, विकी रत्नपारखे, शैलेश रत्नपारखे, विनोद रत्नपारखे,संघर्ष रत्नपारखे, रोहित खरात, अजय चांदोडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. हजारो भाविकांनी या साबुदाणा खिचडीचा लाभ घेतला.

दरम्यान भास्कर अण्णा रत्नपारखे मित्र मंडळातर्फे सुरू असलेल्या या सामाजिक उपक्रमाचे माजी आमदार कैलास गोरंट्याल व महापौर वंदना मगरे यांनी कौतुक केले.

# अवघी दुमदुमली विवेकानंद नगरी

## आषाढी एकादशी निमित्त विवेकानंद इंग्लिश स्कूल व विवेकानंद पब्लिक स्कूलच्या संयुक्त विद्यमाने दिंडी, पालखी व रिंगण सोहळ्याचे उत्साहात आयोजन

**परतूर - प्रतिनिधी**

आषाढी एकादशीचे औचित्य साधून विवेकानंद इंग्लिश स्कूल, परतुर तथा विवेकानंद पब्लिक स्कूल, यांच्या संयुक्त विद्यमाने पारंपरिक दिंडी, पालखी आणि रिंगण सोहळ्याचे भक्तिमय वातावरणात मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाच्या प्रारंभी विठ्ठल-रुक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन करून पालखीचे प्रस्थान करण्यात आले. विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषा परिधान करून टाळ-मृदुंगाच्या गजरात, विठ्ठल नामाचा जयघोष करत दिंडीत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी पारंपरिक पद्धतीने पावल्या खेळत वारकरी संस्कृतीचे जिवंत दर्शन घडविले. तसेच संतांच्या अभंगांचे सुरेल सादरीकरण करून उपस्थितांना भक्तिरसात तल्लीन केले. रिंगण सोहळ्याने कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढविली.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष, संदीप दादा बाहेकर, विवेकानंद प्राथमिक तथा माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शिंदे मॅडम, विवेकानंद इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक, महाजन सर तसेच विवेकानंद पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक, विजयकुमार दंदाले सर यांनी विद्यार्थ्यांना आषाढी एकादशी, वारकरी संप्रदाय, संत परंपरा आणि संस्कारांचे महत्त्व समजावून सांगितले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये भक्ती, समता, बंधुभाव, शिस्त आणि भारतीय संस्कृतीबद्दल आदराची भावना अधिक दृढ झाली. या कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या सहकार्याने *(पान २ वर)*

# महाराष्ट्राच्या मातीतील खेळाचा सन्मान: जालन्यात गुणवंत कबड्डी खेळाडू, पंच व प्रशिक्षकांचा दिमाखदार गौरव सत्कार!

**जालना । प्रतिनिधी**

स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त तसेच महाराष्ट्र कबड्डी दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस, जालना शहर आणि जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील गुणवंत कबड्डी खेळाडू, पंच व प्रशिक्षकांचा भव्य गौरव सत्कार सोहळा रेल्वे स्टेशन रोड येथील क्रीडा प्रबोधिनी, गांधी चमन येथे मोठ्या उत्साहात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडला. जिल्हाभरातून आलेल्या खेळाडू, प्रशिक्षक, पंच, क्रीडाप्रेमी व मान्यवरांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण परिसरात क्रीडामय उत्सवाचे वातावरण निर्माण झाले.




कार्यक्रमाचे उद्घाटन माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदअण्णा चव्हाण होते. व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष नझीर काझी, जिल्हा कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष अक्षय गोरंट्याल, रविंद्र तोर, सौ. शकुंतला कदम, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शहरप्रमुख विष्णू पाचफुले, राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष शेख मेहमूद, डॉ. सुरजसिंह तौर, मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक अशोक पडूळ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविकात प्रा. सोपानराव तेलगड यांनी स्व. अजितदादा पवार यांच्या क्रीडा क्षेत्रातील कार्याचा गौरव करत, ''कबड्डी हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आणि ग्रामीण जीवनाचा अविभाज्य भाग आहे. गुणवंत खेळाडू, पंच व प्रशिक्षकांचा सन्मान म्हणजे नव्या पिढीतील खेळाडूंना प्रेरणा देणारा उपक्रम आहे,'' असे सांगितले. उद्घाटनपर भाषणात माजी मंत्री अर्जुनराव खोतकर म्हणाले, ''कबड्डी हा महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचा खेळ आहे. ग्रामीण भागातील असंख्य युवकांना या खेळामुळे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळाली आहे. अशा गौरव सोहळ्यांमुळे खेळाडूंचा *(पान २ वर)*

# धामणगावच्या शिक्षिका पौर्णिमा शिवाजी चव्हाण यांना मराठवाडा आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

**मंठा । प्रतिनिधी**

शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत धामणगाव येथील शिक्षिका पौर्णिमा शिवाजी चव्हाण यांना आपुलकी व आस्था सेवाभावी संस्था, सेलू यांच्या वतीने आयोजित मराठवाडा आदर्श शिक्षक पुरस्कार व गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्यात मराठवाडा आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.




विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण, संस्कारमूल्ये आणि सर्वांगीण विकासासाठी त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण कार्याचा गौरव म्हणून हा पुरस्कार त्यांना देण्यात आला. या सोहळ्यात मराठवाडा विभागातील अनेक गुणवंत शिक्षक व विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर पौर्णिमा चव्हाण यांनी हा सन्मान आपल्या विद्यार्थ्यांचा, सहकारी शिक्षकांचा आणि कुटुंबियांचा असल्याची भावना व्यक्त केली. त्यांच्या या यशाबद्दल धामणगाव परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून विविध सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.